**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेस नोट क्र. १८०** **दिनांक ०५/०७/२०२१**

# मोबाईल हॅन्डसेट जबरीने चोरी करणा-या २ जणांना तात्काळ अटक- नवघर पोलीसांची कारवाई

फिर्यादी नामे शैलेष खरवार रा- इंदीरानगर झोपडपटटी, भाईंदर-पुर्व, जि. ठाणे यांनी समक्ष पोलीस ठाणेला येवुन तक्रार दिली की, ‘दिनांक ०३/०७/२०२१ रोजी दुपारी-१४.०० वा चे सुमारास फिर्यादी हे भावनारायण बिल्डिंगच्या समोर इंद्रलोक फेज-०३, भाईंदर-पुर्व, ठाणे येथे उभे असतांना एक अनोळखी इसम त्यांच्याजवळ आला व फिर्यादी यांचा ओपो कंपनीचा मोबाईल हॅन्डसेट त्यांचे हातातुन जबरीने खेचुन रिक्षामध्ये बसून पळून गेला’. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन नवघर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र- ४५५/२०२१ कलम- ३९२, ३४ भादंवि प्रमाणे दाखल करण्यात आलेला आहे.

सदरची घटना घडल्यानंतर यातील फिर्यादी हे त्या ठिकाणी चोर-चोर असे ओरडल्यानंतर सदर परिसरात गस्त घालणारे नवघर पोलीस ठाण्याचे बीट क्र-०४ वरिल अंमलदार यांनी फिर्यादी यांच्याजवळ जावून विचारले असता फिर्यादी यांनी घडलेल्या प्रकाराबाबत सविस्तर माहीती दिली. त्यानुसार बीट मार्शल यांनी लागलीच संशईत रिक्षा व अज्ञात आरोपी यांचा पाठलाग केला असता आरोपी हे फिर्यादी यांनी सांगितलेल्या रिक्षामध्ये जात असताना दिसले. त्यावेळी बिट मार्शल यांनी सदर संशयीतांचा पाठलाग करुन नमुद संशयीत यांना ताब्यात घेवून गुन्हे प्रकटीकरण पथकास मदतीकरीता बोलावुन संशयीत नामे १) नसीब बलवीरसिंग वैदय वय-१९ वर्षे रा- भाईंदर-पुर्व व २) राहुल मोजम मंडल वय-१९ वर्षे रा-चुनाभटटी, पालघर ह.मु. तपोवन स्कुलच्या पाठीमागे, भाईंदर-पुर्व, ठाणे यांची अंगझडती घेतली असता त्यांचे ताब्यात फिर्यादी यांचा ओपो कंपनीचा मोबाईल हॅन्डसेटसह इतर वस्तू मिळून आल्या.

**आरोपी क्र.०१** नसीब बलवीरसिंग वैदय यांचे अंगझडतीमध्ये.

१) ३०००/- रुपये किंमतीचा ओपो कंपनीचा ए- ९, ब्लु रंगाचा मोबाईल फोन आयएमईआय ८६६९०४०४६११०२९८, ८६६९०४०४६११०२८० अशी वर्णनाचा जु. वा. किं. सु.
२) ३०००/- रुपये किंमतीचा निळ्या रंगाचा रिअलमी कंपनीचा मोबाईल फोन जु.वा. किं. सु,
३) ३०००/- रुपेय किंमतीचा एक ओपो कंपनीचा मोबाईल फोन जु. वा. की. सु
४) २५००/- रुपये किंमतीचा सॅमसंग कंपनीचा मोबाईल फोन जु.वा.किं.सु.

**आरोपी क्र.०२** राहुल मोजम मंडल यांचे अंगझडतीमध्ये.

१) २५००/- रुपये किंमतीचा एक एम आय कंपनीचा मोबाईल फोन
२) ५००/- रुपये किंमतीचा जिओ कंपनीचा मोबाईल फोन जु.वा.किं.सु. आयएमईआय

क्र.९११५९०१५७९८२३३९

३) ५००/- रुपये किंमतीचा एक काळ्या रंगाचा एल वाय एफ मोबाईल फोन जु.वा. की.सु.
आयएमईआय क्र. ९११६०६००८४४७०५६

४)३५,०००/- रुपये किंमतीची गुन्ह्यात वापरण्यात आलेली ऑटो रिक्षा क्र. एम. एच. ०४ सी. डब्ल्यु. ०५८९

-------------------

५०,०००/- एकुण हस्तगत मालमत्ता रुपये किंमतीची.

वरिलप्रमाणे मुद्देमाल आरोपीतांकडून हस्तगत करण्यात आला असुन आरोपी क्र. १ याच्यावर यापुर्वी मिरारोड पोलीस ठाणे येथे गु.र.क्र- २०३/२०२१ कलम- ३८० भादंवि प्रमाणे गुन्हा नोंद असून उपरोक्त सहा मोबाईल फोन त्याने मिरा-भाईंदर परिसरातून चोरी केल्याचे तपासामध्ये सांगीतल्याने इतर गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

सदरची कामगिरी श्री. अमित काळे पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-०१, डॉ. शशिकांत भोसले, सहा पोलीस आयुक्त, नवघर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. मिलिंद देसाई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे, पोनि प्रकाश मासाळ (गुन्हे), सपोनि योगेश काळे, पोउनि संदिप ओहोळ, पोउनि भगवान पाटील, पोना-२९५६/शेख, पोशि-१७६३ /नवाळे, पोशि-४२०७/भोये यांनी केली आहे.

----oooo----